पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७०**

**सभावृत्तांत**

दिनांक – **१९/०५/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **१९/०५/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
११) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१२) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१३) मा.काळे विमल रमेश
१४) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१५) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सहआयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण,मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.माने, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे - अति.वैद्यकीय अधिकारी, मा.पवार - कायदा सल्लागार, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टूवार, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर - कामगार कल्याण अधिकारी, मा.बोदडे - प्र.अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

अरुणा शानभाग यांचे दु:खद निधन झाले असलेने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४२) | मनपाच्या मुख्य इमारतीसाठी वीजपुरवठा करणा-या पॅनलमधील एसीबी बदलणेकामी Air Circuit Breaker खरेदी करणेबाबत... |
| विषय क्रमांक-४३) | तरतूद वर्गीकरण करणेबाबत – मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४४) | आपत्ती व्यवस्थापन पदी मानधनावर नेमणेबाबत - – मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४५) | प्र.क्र.३९ मधील जी.जी.स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्तीच्या कामास सुधारीत मान्यता मिळणेबाबत व सदरील कामास तरतुद वर्ग करणेबाबत – मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४६) | तरतुद वर्ग करणेबाबत - – मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४७) | मनपाचे गणवेश देय पुरुष कर्मचा-यांसाठी गणवेश कापड खरेदीबाबत... |
| विषय क्रमांक-४८) | वायसीएम हॉस्पिटल येथील चार टॉवर लिफ्टसचे वार्षीक देखभाल दुरुस्ती करणेबाबत... |
| विषय क्रमांक-४९) | उद्योगनगर येथील पत्राशेड साठी कॉमन विद्युत जोड घेणेबाबत... |
| विषय क्रमांक-५०) | तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५१) | तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५२) | तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव... |

--------

अ) दिनांक १२/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ११४८१ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – १९/०५/२०१५ | विभाग – स्थापत्य |
| सुचक –मा.रमा ओव्हाळ | अनुमोदक –मा.संध्या गायकवाड |

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४२७/१४ दि.२७/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/इ मुख्यालय/HO/३४/२०१४-१५ अ.क्र.१ अन्वये, प्र.क्र.७ च-होली व परिसरातील विविध ठिकाणचे मनपाच्या ताब्यात आलेले रस्ते खडीकरण व बीबीएम ने विकसीत करणेकामी ms c l engineers (नि.र.रु.४६,६८,८१८/- (अक्षरी र.रु.शेहेचाळीस लाख अड्डसष्ट हजार आठशे अठरा) पेक्षा -५०.२३% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु. २४,३९,८५४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटिस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११४८२ विषय क्रमांक – २
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४००/१५ दि.५/१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/इ मुख्यालय/HO/३४/२०१४-१५ मधील अ.क्र.८ अन्वये, प्र.क्र.७ च-होली येथील ताजणेमळा, काळजेवाडी कोतवालवाडी पठारे मळा व इतर ठिकाणचे अंतर्गत रस्ते खडीकरण व बीबीएम करणेकामी m/s c l engineers (नि.र.रू.४६,६९,०६०/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख एकोणसत्तर हजार साठ) पेक्षा –५०.२३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२४,३९,९८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४८३ विषय क्रमांक – ३
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/२६२/२०१५ दि.३०/३/२०१५
विषय – प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या शाळा इमारतींची दैनंदिन साफसफाई करणे कामास मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४८४ विषय क्रमांक – ४
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३१५/१५ दि.२०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वाय.सी.एम. रुग्णालयातील हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे दि.१५/७/२०१२ ते दि.१४/७/२०१७ या पाच वर्षे कालावधीचे काम मे.अमृता टेक्नोलॉजी यांचेकडून करारनामा करुन घेणेकामी येणा-या र.रु.५,९९,९०,२८५/- (अक्षरी र.रू.पाच कोटी नव्याण्णव लाख नव्वद हजार दोनशे पंच्याऐंशी) रकमेच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४८५ विषय क्रमांक – ५
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/१०/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.ई मुख्यालय/ HO/ ४६/०१/२०१४–१५ अन्वये, प्र.क्र. ७ च-होली येथील सर्व्हे नं.३०१ ते १३३ मधील २४ मी. व ३० मी रूंदीचा रस्ता विकास आराखडयानुसार खडीमुरूम व बीबीएम करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.३,७३,५०,१००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी त्र्याहत्तर लाख पन्नास हजार शंभर) पेक्षा ३६.०९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२,५०,६३,९७१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४८६ विषय क्रमांक – ६
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/११/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.ई मुख्यालय/ HO/४६/०२/२०१४–१५ अन्वये, प्र.क्र.७ च-होली येथील पठारे मळा ते कोतवालवाडी पर्यंतचा डी.पी. रस्ता विकसीत करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.४,६६,८८,०३४/- **(अक्षरी र.रू.चार कोटी सहासष्ट लाख अठ्ठ्याऐंशी हजार चौतीस)** पेक्षा ३६.०९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३,१३,३०,२३९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४८७ विषय क्रमांक – ७
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/६/कावि/९८/१५ दि.२९/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.रिलायन्स कम्युनिकेशन लि. यांना मनपाच्या विविध कार्यालयांमध्ये इंटरनेट बॅन्डविड्थचे कामकाज तीन वर्षे कालावधीसाठी देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी प्रतिवर्ष येणा-या र.रू.१,१४,९९,००८/- (अक्षरी र.रू. एक कोटी चौदा लाख नव्याण्णव हजार आठ) (+ कर) इतक्या अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११४८८ विषय क्रमांक – ८
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३ई/कावि/१२/२०१५ दि.३०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ई मुख्यालय/HO/४७/०१/२०१४–१५ अन्वये, प्रभाग क्र.७ च-होली पिरबाबा दर्गा ते पठारेमळा पर्यंतचा डी.पी. रस्ता विकसीत करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,४६,९७,४५०/- (अक्षरी र.रू. सात कोटी शेहेचाळीस लाख सत्यान्नव हजार चारशे पन्नास) पेक्षा ३६.०९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५,०१,२६,०९७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११४८९ विषय क्रमांक – ९
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/५४६/२०१५ दि.२८/४/२०१५
विषय - भोसरी एम.आय.डी.सी. मधील जे ब्लॉक येथे बालनगरी विकसित करणे या कामासाठी मे.पी.के.दास अँन्ड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फि अदायगीबाबत...

विषय क्रमांक ९चा दफ्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९० विषय क्रमांक – १०
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३४७/१५ दि.२९/४/२०१५
विषय – अपंग कल्याणकारी योजना क्र.३ अपंगांना चलन वलन साधने खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९१ विषय क्रमांक – ११
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०९/१५ दि.५/५/२०१५
विषय - प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पध्दतीने करणेबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९२ विषय क्रमांक – १२
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०८/१५ दि.५/५/२०१५
विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२७ मधील पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९३ विषय क्रमांक – १३
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३५६/१५ दि.६/५/२०१५
विषय – डिजीटल सोनोग्राफी मशिन खरेदीबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९४ विषय क्रमांक – १४
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३५१/२०१५ दि.७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ७/०५/२०१५ ठराव क्र.९५ नुसार, ई निविदा क्र.१/९/२०१३-१४ मोहननगर, जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामासाठी प्राप्त झालेले फर्स्ट लोएस्ट ठेकेदार (ऑंकार इंजिनिअरींग) २ वर्षाचे लघुत्तम दरानुसार पहिल्या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,११,६००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१३,३९,२००/- तसेच दुस-या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,२०,९००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१४,५०,८००/- एकूण र.रु.२७,९०,०००/- चे कामकाज सेकंड लोएस्ट ठेकेदार मे.वरदायिनी एन्टर प्राईजेस, चिंचवड पुणे ३३ यांचेकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेकामी व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९५ विषय क्रमांक – १५
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३७६/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ७/०५/२०१५ ठराव क्र.९७ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मनपा परिसरातील उदयोन्मुख खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्देशाने क्रिकेट,अथलेटिक्स, बॉक्सिंग, हॉकी, नेमबाजी, फुटबॉल, सॉफ्टबॉल इ. खेळांचे १० ते १५ वर्षे या वयोगटातील एकूण ४०० विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी प्रशिक्षण शिबीर दिनांक ११ मे २०१५ ते २५ मे

२०१५ अखेर १५ दिवस  अशी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी माहे  मे २०१५ मध्ये १५ दिवस  अशी दुरुस्ती करणेत येत असून कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर व श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे आयोजित करणेस  व त्याकामी येणारे र.रु.३,२५,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख पंचवीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी, क्रीडा शिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करिता केलेल्या र.रु.५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | खेळाडू अल्पोपहार खर्च<br>४०० खेळाडू x र.रु.५०/- x १५ =३,००,०००/- | ३,००,०००/- |
| २ | क्रीडा व्याख्याते मानधन<br>प्रतिदिनी र.रु.१०००/- x १५ = १५,०००/- | १५,०००/- |
| ३ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>१५ x १०० x २ दिवस =३,०००/- | ३,०००/- |
| ४ | शिबीर उदघाटन व समारोप बुके खर्च<br>५० x १० x २ दिवस =२,०००/- | २,०००/- |
| ५ | शिबीर अनुषंगाने किरकोळ खर्च र.रु. | ५,०००/- |
| | **एकूण खर्च र.रु.** | **३,२५,०००/-** |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९६ विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/८/कावि/४२/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ७/०५/२०१५ ठराव क्र.९८ नुसार, महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड  शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे  आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.नुपुर लक्ष्मण मोरे हिची बँकॉक थायलॅड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित  राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९७ विषय क्रमांक – १७
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/८/कावि/४३/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ७/०५/२०१५ ठराव क्र.९९ नुसार, महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्रमांक १८ प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.स्वरदा कुमार देशपांडे हिची बँकॉक थायलॅड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- ( अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम मधील गॅलरीला १९३६ च्या बर्लिन ऑलम्पिक मध्ये मेजर ध्यानचंद यांच्या सुवर्ण पदक विजेत्या हॉकी संघात सदस्य असणा-या बाबु निमल, ज्यु फीलिप व २००४ मध्ये ऑलम्पिक मध्ये सहभागी असणारे विक्रम पिल्ले व मुख्य गॅलरीला भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार चार वेळा व ऑलम्पिक वर्ल्डकप चॅम्पियन्स ट्रॉफी आशियाई सुवर्ण पदक विजेते असणारे राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार प्राप्त धनराज पिल्ले यांचे नाव गॅलरीला देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील खेळाडूंच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा व गुणवत्ता वाढ व्हावी या अनुषंगाने शहरातील उत्कृष्ठ खेळाडूंना वर्षामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव गाजवणा-या पुरुष, महिला यांना खाशाबा जाधव पुरस्कार व ११,०००/- व मार्गदर्शक / प्रशिक्षक / क्रीडा संघटक यांना गुरुवर्य पुरस्कार व ५,०००/- अशा पध्दतीने प्रत्येक वर्षी होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९८ विषय क्रमांक – १८
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/४/कावि/२०/२०१५ दि.२८/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ७/०५/२०१५ ठराव क्र.१०० नुसार, अ.क्र.१) वैदुवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव, २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा, चिंचवड व ३) मुंजोबा चौक पिंपळे सौदागर या व्यायामशाळा वगळता उर्वरित प्रस्तावात नमुद तक्त्यातील क्र.१ ते २८ व्यायामशाळांना दि.०१ डिसेंबर २०१३ ते दि.३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर सेवाशुल्क देऊन म.न.पा.व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे. तथापि एकूण २८ व्यायामशाळांची मुदत ३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर संपलेली असल्याने दिनांक १ डिसेंबर २०१३ ते ३१ ऑक्टोंबर २०१४ अखेर सेवाशुल्क देऊन मनपा व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस व त्यानंतर दिनांक १ नोव्हेंबर २०१४ ते ३० जून २०१५ अखेर ११ महिनेसाठी सेवाशुल्क देऊन व्यायामशाळा चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११४९९ विषय क्रमांक – १९
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/०९/पिंपळे निलख/७६६/१५ दि.६/५/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या विकास योजना प्रस्तावानुसार संरक्षण विभागाकडुन विविध ठिकाणाच्या रस्ता रुंदीकरण व रस्त्याच्या जागा हस्तांतरीत करुन घेणेबाबत एकुण १५ प्रस्तावांना संरक्षण मंत्रालयाने काम करण्यास परवानगी दिली आहे. त्यासाठी एकुण र.रु.१५८,१७,३८,५६९/- च्या रक्कमेची मागणी केली आहे. जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत बी.आर.टी रस्त्याची कामे सुरु आहेत. सदर रस्त्याची जागा संरक्षण विभागाकडून मिळाल्यानंतरच रस्त्याची कामे करता येतील याबाबत मा. महालेखाकार, भारत सरकार यांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत व तसा अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला आहे. त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग व मा.आयुक्त यांचे समवेत दि.३।०५।२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संरक्षण विभागाच्या जागा ताब्यात घेऊन रस्त्याची कामे पूर्ण करावीत अशा स्पष्ट सुचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत एकुण १५ प्रस्तावापैंकी महानगरपालिकेच्या खालील तक्त्यात नमुद प्रमाणे संरक्षण विभागास एकुण र.रु.१११,३५,०६,१९७/- अदा केलेले आहेत.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | एकुण क्षेत्र चौ.मी. | एकुण र.रु. कोटी | ताब्यात आलेले क्षेत्र चौ.मी. | अदा केलेली र.रु कोटी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई-पुणे रस्ता (रस्ता अ.क्र.१) | ३९२०५.८९ | २७,८२,७६,४१८/- | ३९२०५.८९ | २७,८२,७६,४१८/- |
| २ | नाशिक फाटा ते वाकड (मौजे पिंपळे सौदागर)(रस्ता अ.क्र.७) | १४२३६.३० | ८,९६,८८,६९०/- | १४२३६.३० | ८,९६,८८,६९०/- |
| ३ | औंध रावेत रस्ता (रस्ता अ.क्र.८) | ९६४३१.१४ | ५०,९८,९१,३२५/- | ९६४३१.१४ | ५०,९८,९१,३२५/- |
| ४ | पिंपळे सौदागर (रस्ता अ.क्र.९) | ६९९४.०२४ | ४,४०,६२,३५१/- | २७८०.०० | १,७५,१४,०००/- |
| ५ | पुणे-आळंदी रस्ता (रस्ता अ,क्र.१२) | ७८,१५५.५१ | ११,४३,२१,९७४/- | ७८,१५५.५१ (वर्किंग परमिशन मिळालेली नाही.) | ११,४३,२१,९७४/- |
| ६ | पिंपरी (डेअरी फार्म) | ८०८१.३१ | २,८६,८७,५५०/- | ८०८१.३१ (वर्किंग परमिशन मिळालेली नाही.) | २,८६,८७,५५०/- |
| ७ | पिपळे निलख रस्ता अ,क्र.३ रस्ता नं.५ (एल ते एम) | ११९२४.८० | ७,५१,२६,२४०/- | ११९२४.८० | ७,५१,२६,२४०/- |
| | | | | एकुण | १११,३५,०६,१९७/- |

प्रस्तावात नमूद संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये डिफेन्स इस्टेट ऑफिसर यांनी अ.क्र. ४ रस्ता नं. ६ (जे ते एन) पिंपळे निलख ह्या रस्त्या करिता ची सर्व र. रु. १२,९४,६३,३५६/- अदा करणेबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने अ.क्र.४ रस्ता नं. ६ (जे ते एन) पिंपळे निलख ह्या रस्त्या करिता संरक्षण विभागाने मागणी केले नुसार सर्व रक्कम रु. १२,९४,६३,३५६/- प्राधान्याने अदा करणे आवश्यक असल्याने त्याबाबत कार्यवाही करणेत येत आहे. सदर रक्कम संरक्षण विभागास अदा करणेस स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता आवश्यक आहे. तरी विषयांकित प्रकरणी संरक्षण विभागास र. रु. १२,९४,६३,३५६/- (अक्षरी बारा कोटी चौ-यान्नव लाख त्रेसष्ट हजार तीनशे छपन्न फक्त) अदा करणेस मान्यता व जागा हस्तांतरणा संबंधी इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०० विषय क्रमांक – २०
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५१७/२०१५ दि.११/५/२०१५

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र 'अ'मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०१ विषय क्रमांक – २१
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३९/१५ दि.११/५/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा नोटीस क्र. १६/१/२०१४-१५अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता ५०० मे.टन लिक्विड क्लोरीन वायु खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या ५ निविदा दि.१९/०३/२०१५ रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेकेदार | प्राप्त निविदा दर रू. | |
|---|---|---|
| मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. | ७,९५०/- प्र.मे.टन | 1st Lowest |
| मे.रंग रसायन | ९,४९५/- प्र.मे.टन | 2nd Lowest |
| मे.केमिकल पिपल | ९,४९५/- प्र.मे.टन | 2nd Lowest |
| मे.जी. एस. कमर्शियल कॉर्पोरेशन | ९,९००/- प्र.मे.टन | 3rd Lowest |
| मे.मधुमय उद्योग | १०,९००/- प्र.मे.टन | 4thLowest |

वरीलपैकी मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांची र. रू.७,९५०/- प्र. मे.टन दराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये लिक्वीड क्लोरीन वायु हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असने गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.५ नुसार सदरची खरेदी ६०:४० या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ६०%व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकुण परिमाणाच्या ४०%परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. सदर अटीनुसार एकूण परिमाणाच्या ६०%प्रमाणे मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि.यांचेकडून ३०० मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस र. रू.७,९५०/- प्र.मे.टन या दराने खरेदी करणेस मा.आयुक्त यांनी दि.३०/०४/२०१५ चे प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे. तरी मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि.यांचेकडून ३०० मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस रू.७,९५०/- प्र.मे.टन या दराने खरेदी करणेसाठी त्यांच्याशी करारनामा करणेस व याकामी येणारा खर्च र.रू.२३,८५,०००/- यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०२ विषय क्रमांक – २२
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/ले१/कावि/२२३/२०१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४८/२०१४-१५ मधील अ.क्र. १ अन्वये चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये वस्ती डी.वाय.पाटील शाळा ते पंपीग स्टेशन नाल्यापर्यंत पावसाळी पाण्याकरिता १२०० मी.मी. व्यासाची पाईपलाईन टाकणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.१,१३,०४,८३२/- (अक्षरी र.रू.एक कोटी तेरा लाख चार हजार आठशे बत्तीस फक्त) पेक्षा ४३.८३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.६६,६७,४२०/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०३ विषय क्रमांक – २३
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय,जलनिःसारण
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/जनि/TBdrainage/१४३/१५ दि.११/५/२०१५
विभाग - ब परिसरातील वार्षिकी ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरूस्ती करणेबाबत...

विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०४ विषय क्रमांक – २४
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/३८१/१५ दि.११/५/२०१५
विषय - क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करून मोशी कचरा डेपोत खाली करून पसरून देणेबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०५ विषय क्रमांक – २५
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/२०१५ दि.१६/३/१५
विषय – मानसेवी पी.जी टिचर्सच्या नेमणुकीबाबत...

विषय क्रमांक २५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०६ विषय क्रमांक – २६
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१९४/१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मनपामार्फत दि.१/४/१५ ते ३०/४/१५ या एक महिन्याच्या कालावधीत अनधिकृत बांधकामांना नोटीस बजाविणेची व निष्कासनाची कारवाई करणेत आली आहे. यासाठी सहा क्षेत्रीय कार्यालये व दोन बीआरटीएस विभागांना प्रत्येकी १-१ याप्रमाणे ८ फोटोग्राफर व ८ व्हीडीओग्राफर अशा एकूण १६ व्यक्तींची नेमणुक एजन्सी मार्फत करण्यात आली होती. सदरचे फोटोग्राफीसाठी कोटेशन नोटीस क्र.२/१४-१५ प्रसिध्द करणेत आली असता तीन एजन्सीपैकी मे.रामा व्हीजन, थेरगांव यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.८४ टक्के सर्वात कमी असल्याने ते स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी दि.३१/३/१५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा कालावधी अल्प असल्याने करारनामा न करता या कामांसाठी अंदाजे र.रु.५०,०००/- अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच व्हिडीओग्राफीसाठी कोटेशन नोटीस क्र.१/२-१४/१५ नुसार मे.दर्शन डिजीटल व्हिडीओग्राफी यांचे लघुत्तम दर अ)एका दिवसाचे एका कार्यक्रमाचे १ तासासाठी शुटिंग करुन डाटा डीव्हीडीसह देणे र.रु.२३००/- तसेच ब)जास्तीचे रेकॉर्डीगसाठी प्रती १ तास डाटा डिव्हीडीसह देणे र.रु.७००/- असे असून सदरचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३३ % जास्त असून स्विकृत करणेस मा.आयुक्त यांनी दि.२७/१/२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजे र.रू. १,१५,५००/- किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे.रामा व्हिजन तसेच मे.दर्शन डिजीटल व्हिडीओग्राफी यांना दि.१/४/२०१५ रोजी कामाचे आदेश देण्यात आलेले असल्याने केलेल्या संविदेची तसेच येणा-या खर्चाची माहिती अवलोकन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०७ विषय क्रमांक – २७
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१९६/२०१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने दि.१९/३/२०१५ ते ५/४/२०१५ या कालावधीत अनाधिकृत बांधकाम आढावा बैठक, कनिष्ठ अभियंता व स्थापत्य सहाय्यक या पदाचे परिक्षा तसेचट्रिंग ट्रिंग डे (सायकल डे) कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी पुणे २७ यांच्याकडून (मे.रामा व्हिजन, थेरगांव यांच्याकडील जुन्या दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु.२१,६००/- (अक्षरी र.रु.एकवीस हजार सहाशे फक्त) इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०८ विषय क्रमांक – २८
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१अ/कावि/३३४/२०१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.सतिश गुप्ता, एम.डी (जनरल मेडीसीन) यांना मानसेवी तज्ञ पदावर दरमहा एकत्रित र.रु.५,०००/- मानधनावर वाय.सी.एम. रुग्णालयात आदेशाच्या दिनांकापासून ६ महीने कालावधीसाठी नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५०९ विषय क्रमांक – २९
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/४४२/२०१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ई-गर्व्हेन्न्स विभाग यांनी मागणी केली प्रमाणे त्यांना ई-निविदा संगणक प्रणालीचे Secure Socet Layer (SSL) व्दारे नुतनीकरण करुन देणे आवश्यक आहे. Secure Socet Layer (SSL) नुतनीकरण करणेकामी नवीन कोटेशन अथवा निविदा काढलेस वेळ व जादा खर्च येण्याची शक्यता नाकरता येत नाही. तरी यापूर्वी मे.टेक ९ सर्व्हीसेस यांचेकडून ई-नि.क्र. २७/२०१४-१५ अन्वये ई-निविदा प्रणालीचे Secure Socet Layer (SSL) व्दारे नुतनीकरण करणेत आलेले आहेत. करारनामातील अट क्र.१० अन्वये १ वर्षासाठी मंजूर दरानेच जादामाल/साहित्य पुरवठाकरणेबाबत नमुद करणेत आलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे, उद्योग, ऊर्जा व कामगार कल्याण यांचेकडील शासन निर्णय क्र.भांतस/१०८८/(२५१२) उद्योग-६ दि.०२/०१/१९९२ चे परिशिष्ट सहा मधील परिच्छेद ८.३ (ह) पुनर्प्रत्ययी (Repeat Order) बाबतचे मार्गदर्शक तत्वांनुसार पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते मुळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या अवधीतच देण्यात यावेत. असा स्पष्ट उल्लेख शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला असल्याने मनपाचे विविध विभागांकडील ई-निविदा संगणक प्रणालीचे Secure Socet Layer (SSL) व्दारे १ वर्षासाठी नुतनीकरण करणे आवश्यक आहे. उक्त मागणी केलेले ई-निविदा संगणक प्रणालीचे Secure Socet Layer (SSL) चे दर ई-नि.सु.क्र.२७/२०१४-१५ नुसार (बाब क्र.२) प्रती नग र.रु.१,५५,०२५/- प्रमाणे १ वर्षासाठी नुतनीकरण करणेकामी एकूण र.रु.१,५५,०२५/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे र.रु.१,५५,०२५/- चे खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५१० विषय क्रमांक – ३०
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/१५९/२०१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका “अ” क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील सर्व कचराकुंडया, रस्त्याचे, गटर्सच्या कडेचे कच-याचे ढीग, मोकळ्या जागेतील कच-याचे ढीग उचलणे व त्याची वाहतुक करुन भोसरी कचरा

स्थानांतरण केंद्र अथवा मोशी कचराडेपो येथे टाकणे कामासाठी निविदा नोटीस क्र.४-१/२०१३-१४ नुसार ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ५ निविदांपैकी मे.आर.जी.मंगळवेढेकर यांनी सादर कलेली अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.६३ % कमी ही निविदा स्विकृत करणेत आली असुन मा.स्थायी समिती ठराव क्र.५९२९ दिनांक १३/२/२०१४ नुसार याकामी १२ महिने या कालावधीसाठी (१) कचरा स्थानांतर केंद्र प्रति वाहन प्रतिदिन २ खेपांसाठी र.रु. ३,३९५/- व (२) मोशी कचरा डेपो प्रति वाहन प्रति दिन २ खेपांसाठी र.रु.३,४९५/- अशा प्राप्त दराने वाहने प्रति दिनी पुरविणे, कामाचा करारनामा करणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार “अ” क्षेत्रीय कार्यालयाकडे ५ व “फ” क्षेत्रीय कार्यालयाकडे ५ वाहने पुरविणेकामी कामाचे आदेश देणेत आले आहेत. त्यानुसार सदर कामाची मुदत दि.१/५/२०१४ ते दि.३०/४/२०१५ अशी आहे. सदर ठेकेदार यांची कामाची मुदत संपल्याने नव्याने ठेकेदार निश्चितीकामी “अ” व “फ” क्षेत्रिय कार्यालयांमार्फत निविदा कार्यवाही करणेत येत आहे. सदर निविदा कार्यवाही अंतिम होवून कामाचे आदेश देणेसाठी किमान २ महिने कालावधी अपेक्षित असलेने सध्याचे नियुक्त ठेकेदार यांना २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास दि.५/५/२०१५ चे प्रस्तावानुसार मान्यता देणेत आली आहे. याकामी संबंधित ठेकेदार यांचेशी दि.५/५/२०१५ रोजी करारनामा करुन कामाचे आदेश देणेत आले असल्याने (अंदाजे अपेक्षित खर्च र.रु.२०,९७,०००/- (अक्षरी र.रू.वीस लाख सत्यान्नव हजार) त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५११ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/१४३/२०१५ दि.१३/५/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१४-१५ मधील अ.क्र.२५ अन्वये, प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मध्ये उर्वरित ठिकाणी खडीमुरूम व बीबीएम पध्दतीने रस्ते करणेकामी मे.सांडभोर कन्स्टक्शन (नि.र.रु.२२,४०,८०५/- (अक्षरी र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे पाच फक्त) पेक्षा ४९.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.११,७६,६५८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेवून कामाचा आदेश दिला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६६/१५ दि.१३/५/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल, २०१५ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१३ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६७/१५ दि.१३/५/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३.४.२०१५ ते दि.१९.४.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/६७/२०१५ दि.१३.५.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१४ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६८/१५ दि.१३/५/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२०.४.२०१५ ते दि.२६.४.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/६८/२०१५ दि.१३.५.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५१५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६९/१५ दि.१३/५/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२७.४.२०१५ ते दि.३.५.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/६९/२०१५ दि.१३.५.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५१६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/७०/१५ दि.१३/५/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.४.५.२०१५ ते दि.१०.५.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/७०/२०१५ दि.१३.५.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – दूरसंचार
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/४/कावि/६८/२०१५ दि.१३/५/१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

तालेरा रूग्णालय येथे व भविष्यात मनपाचे विविध कार्यालये, रूग्णालये, दवाखाने, प्रभाग कार्यालये, अग्निशमन केंद्रे, करसंकलन कार्यालये इत्यादी सर्व ठिकाणी मे.बीएसएनएल, मे.रिलायन्स व मे.टाटा यांची दूरध्वनी सुविधा व ISDN PRI लाइन घेणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१८ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/१/कावि/१८२/१५ दि.१४/५/१५
विषय – फेरीवाला धोरण अंमलबजावणी अंतर्गत बायोमेट्रीक पद्धतीने शहरातील फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करणेबाबत...

विषय क्रमांक ३८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५१९ विषय क्रमांक – ३९
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – नगरसचिव
सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/२/कावि/२१६/१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.सेक्रेटरी, अखिल भारतीय महापौर परिषद, नवी दिल्ली यांचेकडील पत्रानुसार अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१५-२०१६ ची वार्षिक वर्गणी र.रू.२०,०००/- (अक्षरी र.रू.वीस हजार) All India Council of Mayors या नावे धनादेशाव्दारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५२० विषय क्रमांक – ४०
दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/३७८/१५ दि.१३/५/१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करतानासन्मानीय पत्रकारांना आवश्यक दयावयाचे बॅग ४० X ३० से.मी. रंग काळा व पेनड्राईव्ह ४ GB – TRANSEND (मनपा पसंत नमुन्याप्रमाणे) साहित्य खरेदीकामी ऑनलाईन कोटेशन नोटीस क्र.५६/२०१४-१५ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त कोटोशन मधील बॅग ४० X ३० से.मी. रंग काळा १० नग व पेनड्राईव्ह ४ GB – TRANSEND १० नग (मनपा पसंत नमुन्याप्रमाणे) खेरदीकामी मे.इंन्दु इन्फोटेक सोल्युशन भोसरी

यांचेकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण र.रु.१०,१३०/- (अक्षरी र.रू.दहा हजार एकशे तीस) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२१ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.अनिता तापकीर अनुमोदक –मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/१८७/१४ दि.१४/५/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/ड मुख्यालय/HO/०२/२०१४-१५ मधील काम क्र.५२ अन्वये, प्र.क्र.३३ गवळीनगर मधील स.नं.२०० पासुन कै.सखुबाई गबाजी गवळी उद्यान पर्यंतचा नाला दुरूस्ती करणेकामी मे.एन.एन.शिंगाडे (नि.र.रु.१३,९९,५९६/- (अक्षरी र.रू. तेरा लाख नव्व्यान्नव हजार पाचशे शहान्नव फक्त) पेक्षा ४१.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.८,५२,५०१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

<u>**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –**</u>

ठराव क्रमांक – ११५२२ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/२४८/१५ दि.१५/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या मुख्य इमारतीसाठी वीजपुरवठा करणा-या पॅनलमधील एसीबी बदलणेकामी Air Circuit Breaker खरेदी करणेबाबत ई निविदा सुचना क्र. ३६/२०१४-१५ अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.एनर्जी टेक सिस्टीम्स बाब क्र.१ व २ या साहित्याचे दर र.रु.५,३५,९१३/- चे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ५.४१% ने कमी असल्याने स्विकृत करुन सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी केलेल्या संविदेची माहितीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

सन २०१५-१६ चा मूळ अंदाजपत्रक ब मुख्यालयाकडील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११५२४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

ओमप्रकाश किसनराव बहिवाल यांस र.रु.४५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचेचाळीस हजार फक्त) एकत्रित मानधनावर कालावधीकरीता वाहन व दूरध्वनी/मोबाईल बील या पूर्वीच्या सवलतीसह आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा मुख्य समन्वयक आपत्ती व्यवस्थापनपदी नेमण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२५ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३९ मधील जी.जी.स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्ती काम ठेकेदार मे.डी.एस.कुलकर्णी हे निविदा क्र.१९/२४/२०१३-१४ अन्वये करीत आहेत. जी.जी. स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्तीचे काम करणे असून सदर कामाची निविदा र.रु.६३,००,०१४/- इतकी आहे. जी.जी.स्कुल मागील नाल्याच्या महात्मा फुलेनगरकडील सी.डी. वर्कच्या बाजूने नाल्याचे काम करणेची आवश्यकता असलेने ते सदर कामामधून करणेकामी सदर कामास आवश्यक र.रु.९३,००,०१४/- पर्यंत सुधारित मान्यतेची आवश्यकता आहे. तरी प्रभाग क्र.३९ जी.जी. स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे (नि.क्र.१९/२४/२०१३-१४) कामास र.रु.६३,००,०१४/- अधिक र.रु.३०,००,०००/- असे एकूण र.रु.९३,००,०१४/- चे सुधारित खर्चास तसेच सदरील कामास सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२६ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक –मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.संपत पवार, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/५५९/१५ दि.१८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाचे गणवेश देय पुरुष कर्मचा-यांसाठी गणवेश कापड खरेदीकामी निविदा सुचना क्रं. ३७/२०१४-१५ अन्वये १) मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म पुणे यांना बाब क्रं. १,२,३,४,५,६,७,८,९ व १० साठी २) मे.महावीर कार्पोरेशन चिंचवड यांना बाब क्रं. ११ व १२ साठी या निविदाधारकाचे दर लघुत्तम प्राप्त झाले आहेत. त्यानुसार गणवेश कापड खरेदीकामी खालीलप्रमाणे एकुण खर्च येणार आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | बाब क्रं. | एकुण र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म. (रेमण्ड कंपनीचे सुटींग) | १,२,३,४,५,६,७,८,९ व १० | १,९२,१४,९०७/- | ९.९५% ने जादा |
| २ | मे.महावीर कार्पोरेशन (बॉम्बे डाईग कंपनीचे सुटींग) | ११ व १२ | ७,१३,२७८/- | ०.६१% ने कमी |
| | | एकुण र.रु. | १,९९,२८,१८५/- | ९.५३% ने जादा |

वरिलप्रमाणे १) मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म पुणे २) मे.महावीर कार्पोरेशन चिंचवड या निविदाधारकांकडुन प्राप्त लघुत्तम दराने गणवेश कापड खरेदीकामी एकुण र.रु.१,९९,२८,१८५/- इतका अपेक्षीत आहे. भांडार विभागाकडील गणवेष खरेदी या लेखाशिर्षावर र.रु.१,५०,००,०००/- तरतुदी उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार गणवेश कापड खरेदी या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणेत येईल.

सबब मनपाचे पुरुष कर्मचा-यांसाठी गणवेश कापड खरेदीकामी १) मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म पुणे २) मे.महावीर कार्पोरेशन या निविदाधारकांकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण र.रु.१,९९,२८,१८५/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपाचे गणवेश देय पुरुष कर्मचा-यांकरीता पुरुष गणवेश खरेदीकामी ई निविदा क्र. ३७/२०१४-१५ अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार श्री.महालक्ष्मी ड्रेसेस अँण्ड टेलरींग फर्म, वाकड यांचे १ ते १० बाबींचे रेमण्ड कंपनीचे शुटींग कापडाचा लघुत्तम दर एकूण रक्कम रुपये १,९२,१४,९०७/- व मे.महावीर कार्पोरेशन, चिंचवड यांचे ११-१२ बाबींसाठी बॉम्बे डाईग कंपनीचे शर्टींग कापडाचे लघुत्तम दर एकुण रक्कम रुपये ७,१३,२७८/- स्वीकृत करुन करारनामा करण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्याची मा.आयुक्त यांनी मागणी केली आहे. सदर मागणीनुसार मान्यता देण्यात येत आहे व येणा-या एकुण खर्चास व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मनपाच्या गणवेश देय पुरुष कर्मचा-यांसाठी गणवेश खरेदीकामी ई निविदा सुचना क्र. ३७/१४-१५ नुसार निविदेतील प्राप्त लघुत्तम दराने १ ते १० बाबींसाठी पुढील दोन वर्षांसाठी सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता आवश्यकतेनुसार पुरुष गणवेश शुटींग करीता रेमण्ड कंपनीचे लघुत्तम निविदाकार श्री.महालक्ष्मी ड्रेसेस अँण्ड टेलरींग फर्म, वाकड निविदाधारक यांच्याकडून पुर्नप्रत्ययी खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता करारनामा करुन पुरवठा आदेश देण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/कक्षेका/वायसीएमएच/३४५/१५ दि.१९/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.ओटीस हे स्वतः उत्पादक कंपनी असुन त्यांनी आजपर्यंत समाधानकारकपणे कामकाज केलेले आहे. त्यांनी सादर केलेले दर हे बाजारभावानुसार योग्य व वाजवी आहेत. तरी यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल येथील चार टॉवर लिफ्ट्सचे १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१८ ह्या कालावधीकरीता वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे काम करारनामा करुन थेट पद्धतीने करवून घेणेस व त्याकामी येणारा खर्च प्रति वर्षी (र.रु.७,४८,१५४/-+टॅक्सेस),100%Yearly in Advance) मे.ओटीस यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५२९ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १९/०५/२०१५ विभाग – स्थापत्य BSUP प्रकल्प

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक –मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP प्र/१६६/१५ दि.१६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

JnNURM-BSUP अंतर्गत वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसनासाठीचे Insitu प्रकल्प असल्याने कामातील इमारती बांधमेकरीता झोपडपट्टी धारकांना उद्योगनगर येथील पत्राशेड येथे स्थलांतरीत केले होते. उद्योगनगर पत्राशेड धारकांनी पत्राशेड मध्ये राहत असताना प्रतिमहा येणार वीजबील न भरल्यामुळे मे.MSEDCL यांनी त्यांचे वीजमीटर काढून नेले होते. मे.MSEDCL पत्र क्र.AddEE/CHD/T/1176 दि.०२/१२/२०१४ अन्वये यांनी कळविल्याप्रमाणे उद्योगनगर पत्राशेड धारक अनधिकृतपणे वापर करीत होते. तेथील वीजपुरवठा दि.०७/०५/२०१५ रोजी खंडीत झाल्याने उद्योगनगर पत्राशेड येथे सध्या वीजपुरवठा नाही. उद्योगनगर पत्राशेडमध्ये सध्या १०८ पात्र ५५ अपात्र व ३० भाडेकरु असे एकूण १९३ पत्राशेड धारक राहत आहेत. वेताळनगर पुनर्वसन प्रकल्पामध्ये एका इमारतीचे ११२ गाळ्यांचे बांधकाम पूर्ण होवून त्यास भाग भोगवटा प्रमाणपत्र मिळून बिल्डींग लाभार्थ्यांना वाटपासाठी तयार आहे. त्याठिकाणी पत्राशेड येथील पात्र रहिवाशी हलविल्यास वीजेचा प्रश्न मिटू शकतो. कारण नवीन घरामध्ये महापालिकेमार्फत वीज मीटर कनेक्शन देण्यात येते. सद्यस्थितीत लाभार्थ्यांचे पैसे भरण्याचे काम सुरु आहे. लाभार्थ्यांची यादी फायनल करणे, लकी ड्रॉ होणे यास १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. तेवढ्या कालावधीत इमारतीची साफसफाई, तुटलेल्या काचा बसविणे इ. कामे केली जातील. तरी त्याठिकाणी एक कॉमन वीजमीटर तात्पुरत्या स्वरुपात बसविल्यास वीजेचा प्रश्न सुटू शकतो. कॉमन वीजमीटर डिपॉझिट आणि सर्व्हिस चार्जेस इ. करीता र.रु.३,९३,९४३/- चे कोटेशन मे. MSEDCL यांनी दिलेले आहे. तरी तात्पुरत्या स्वरुपात वीजमीटर घेणेकामी व येणा-या प्रत्यक्ष वीजबील खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५३० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.८७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५३१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.१,१८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५३२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १९/०५/२०१५

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.४५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५६/२०१५
दिनांक - १९/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.